# पुस्तक प्रकाशन सोहळा

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथील वाणिज्य विभागाचे डॉ.प्रभाकर महाले लिखित या वर्षाच्या(2020-21) तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाच्या नवीन बदललेल्या अभ्यासक्रमानुसार सक्तीच्या विषयाचे ,'व्यवसाय व्यवस्थापन ' या पुस्तकाचे प्रकाशन दि बोदवड सार्व एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मा.श्री मिठूलालजी अग्रवाल,संस्थेचे सचिव मा श्री विकासभाऊ कोटेचा ,मा श्री प्रकाशचन्द्र सुराणा, ज्येष्ठ संचालक श्रीरामभाऊ बडगुजर, मा अशोक भाऊ जोगड, प्रोफेसर प्राचार्य डॉक्टर अरविंद चौधरी उपप्राचार्य श्री डी एस पाटील यांच्या हस्ते करण्यात आले सदर प्रसंगी श्री प्रकाशजी सुराणा यांनी डॉ प्रभाकर महाले यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने वाणिज्य वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्काचे लिखाण केले असून विद्यार्थ्यांना फायदा होईल असे प्रतिपादन केले तसेच संस्था चेअरमन व सचिव यांनीसुद्धा डॉ महाले यांचे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल अभिनंदन केले या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर अरविंद चौधरी यांनी सुद्धा डॉ महाले प्रमाणे इतर अध्यापकांनी चांगले दर्जेदार पुस्तक लिहिण्याचे काम करावे व संस्थेच्या नाव लौकिकात भर घालावी असे प्रतिपादन केले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डी एस पाटील, डॉ अनिल बारी ,अजय पाटील, डॉ गीता पाटील,डॉ चेतन शर्मा श्रीमती दमाडे मॅडम महाविद्यालयाचे मुख्य कार्यालय अधीक्षक बाबुराव हिवराळे, डॉ मनोज निकाळजे, डॉ विनोद चौधरी यांच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा पार पडला.



